Volume - 4 (2024)
Issue - 2 (April)

LIBRARY SCHOLAR
International Peer-Reviewed Journal of Library Science

ISSN
2583-2549

# शैक्षणिक ग्रंथालये आणि ग्रंथपालाची भूमिका

**श्री. किशोर रामदास माळी**
ग्रंथपाल
हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यू. कॉलेज
दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे

---

**सार:** शालेय शिक्षणाचा काळ विद्यार्थी जीवनात फार महत्वाचा असतो. या काळात विद्यार्थ्यांवर जे संस्कार केले जातात तेच संस्कार त्यांच्यावर पुढेही कायम राहतात. या काळात त्यांच्यावर बौद्धिक, मानसिक विकास करणे, वाचनाची आवड निर्माण करणे, वाचनाचे फायदे समजावून सांगणे यांसारखे ज्ञानाची जिज्ञासा निर्माण करण्याचे काम शालेय जीवनात ग्रंथालयामार्फत करणे जरूरीचे आहे. विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच ग्रंथालयाचा वापर करण्याची संधी दिली गेली पाहिजे. त्यांना ग्रंथालयाचा वापर करण्याची संधी दिली नाही तर त्यांना शाळा, महाविद्यालयातून मिळणारे शिक्षण केवळ पाठपुस्तकी स्वरूपाचेच राहील व चांगल्या शिक्षणापासून विद्यार्थी वंचित राहतील. विद्यार्थ्यांना चांगले समाज जीवन जगण्याचे, सशक्त नागरिक बनण्याचे तसेच त्यांच्यातील व्यक्तीमत्वाचा विकास करण्याचे शिक्षण हे शालेय शिक्षणाचे आणि त्यात ग्रंथालयाचे उद्दीष्ट असले पाहिजे. ग्रंथालयाचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात. सार्वजनिक ग्रंथालये, शैक्षणिक ग्रंथालये आणि विशेष ग्रंथालये. या लेखात शैक्षणिक ग्रंथालये आणि त्या ग्रंथालयामध्ये वाचकांच्या हिताच्या दृष्टीने ग्रंथपालाची भूमिका या विषयावर विवेचन करण्यात आले आहे.

**शोध संज्ञा**: शालेय, महाविद्यालयीन, विद्यापीठीय ग्रंथालय,ग्रंथालय परिचय, पेटी ग्रंथ, वाचक सारांश, पुस्तक प्रदर्शन.

---

**प्रस्तावना**:

मानवी जीवनात ग्रंथाचे महत्व अनन्य साधारण आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंतच्या मानवाच्या कल्पनांची, विचारांची, भावनांची आणि अनुभवांची ग्रंथ ही एक शिदोरी आहे. ही शिदोरी वाचकांपर्यंत पोहचविण्याचे महत्वाचे काम शाळेच्या ग्रंथालयात ग्रंथपालमार्फत होणे जरुरीचे आहे. आजचे माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग हे प्रसिद्धीचे युग आहे. आपल्याकडे असलेली साधन संपत्ती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी निरनिराळ्या मार्गांनी प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न केला जातो. केवळ उद्योजक, कारखानदार यांनाच याचा अवलंब करावा लागतो असे नाही तर शाळा, ग्रंथालयांनाही या तंत्राचा अवलंब करायला हवा. यासाठी ग्रंथपालाने मोलाची भूमिका ग्रंथालयात निरनिराळ्या माध्यमातून बजवायला हवी.जेणेकरून अधिकाधिक वाचकांच्या ( विद्यार्थी,शिक्षक, संशोधक ) अभ्यासात, ज्ञानात, प्रगतीत भर होण्यास मदत होईल. त्या करिता

शालेय ग्रंथालयाने वाचकांना वाचनसाहित्याची माहिती उपलब्ध करून दिली पाहिजे. केवळ याच्यावरच न थांबता ग्रंथालय किती प्रकारे त्यांना फायदेशीर आहे. तेथे कोणकोणत्या सोयी- सुविधा उपलब्ध आहेत. ग्रंथालयाची वेळ कोणती आहे. तेथील वाचन साहित्य किती प्रकारचे आहे तसेच ग्रंथालयात वाचकांसाठी कोणकोणते अवांतर कार्यक्रम होतात. अशा अनेक प्रकारची माहिती वाचकांना करून देणे ग्रंथपालाचे कर्तव्य आहे. त्यामुळे वाचकांची संख्या वाढेल. परिणामी वाचक अनेक ग्रंथांचा उपयोग करून घेतील. त्यामुळे ग्रंथालयाची उद्दिष्ट्ये साध्य होण्यास मदत होईल. ग्रंथालयाची प्रसिद्धी वाढावी व शाळा- महाविद्यालयाची उद्दिष्ट्ये साध्य व्हावी या दृष्टीने ग्रंथपालाची भूमिका फार महत्वाची असते.

**शैक्षणिक ग्रंथालय**: शैक्षणीक ग्रंथालयामध्ये तीन प्रकारच्या ग्रंथालयांचा समावेश होतो.

१) शालेय ग्रंथालय
२) महाविद्यालयीन ग्रंथालय
३) विद्यापीठ ग्रंथालय

**१) शालेय ग्रंथालय**:

या ग्रंथालयात प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक ग्रंथालय असे प्रकार पडतात. प्राथमिक शाळेतील बालवाचक हे साधारणत: ५ ते १० वयोगटातील असतात. लहान वयातच त्यांच्या बालमनावर सुसंस्कार होण्यासाठी त्यांच्या दृष्टीकोणातून साहित्याची निवड होणे आवश्यक आहे. त्याहेतूनेच ग्रंथालयासाठी ग्रंथपालाने मोठ्या टाईपमधील मुद्रण, थोर नेत्यांची चरित्रे, किशोर कथा, रामायण, महाभारत, प्रवासवर्णने यांसारख्या पुस्तकांची खरेदी करायला हवी. त्यासाठी शालेय ग्रंथपाल हा प्रशिक्षीत असावा. त्याने बालवाचकांना ग्रंथालयाचे महत्व पटवून द्यायला पाहिजे.

माध्यमिक शालेय ग्रंथालयात ९ ते १२ वयोगटातील विद्यार्थी असतात. विकसनशील देशाचा सुजाण नागरिक घडविण्याचा दृष्टीने हा वयोगट पाया ठरतो. याच वयात विद्यार्थ्यांची जडणघडण ग्रंथालयाच्या माध्यमातून करण्यासाठी ग्रंथपालाने सर्वोतपरी प्रयत्न केले पाहिजे. यासाठी ग्रंथपालाने त्यांच्यासाठी चरित्रे, विज्ञान, तंत्रज्ञान विषयीचे पुस्तके, कथासंग्रह, कादंबऱ्या नकाशे, शब्दकोश यांसारख्या पुस्तकांची निवड करायला पाहिजे. या वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी ग्रंथपालाने वाचनाचे महत्व तसेच उज्वल भविष्यासाठी ग्रंथांचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून द्यायला हवे.

यासाठी माध्यमिक शाळेचा ग्रंथपाल हा योग्य गुणवत्तेचा असणे आवश्यक आहे. तसेच त्या ग्रंथपालाला संगणक, स्लाईड, प्रोजेक्टर, याविषयी माहिती असणे आवश्यक तर आहेच. पण ते कसे हाताळावे याचेही ज्ञान त्याला असणे आवश्यक आहे. तसेच खासकरून ग्रंथपालाने ९ वी. ते १२ वी. च्या विद्यार्थ्यांचा वाचन निवडीचा अभ्यास करून या महितीचा उपयोग त्या विषयांचे ग्रंथ खरेदी करण्यास करायला हवे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वाचन अभिरुचिस ग्रंथपालाला वाव देता येईल.

**२) महाविद्यालयीन ग्रंथालय**:

महाविद्यालयीन वाचक हे साधारणत: १८ ते २५ वयोगटातील असतात. या ग्रंथालयांमध्ये पदवी, पदव्युत्तर, तंत्रनिकेतन इत्यादींचा समावेश असतो. या मध्ये प्रवेश घेणारे विद्यार्थी तरुण वयोगटातील असतात. त्यांची बौद्धिक क्षमता वाढलेली असते.त्यामुळे त्यांच्यावर ग्रंथालयात वैयक्तिक लक्ष देणे ग्रंथपालाचे काम असते. महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये संदर्भग्रंथ, वैचारिक कथासंग्रह, विश्वकोश, शब्दकोश, नकाशासंग्रह, कादंबऱ्या, ललित साहित्य, ऑडिओ- व्हिडिओ कॅसेट अशा प्रकारच्या सर्व वैचारिक साहित्य साधनांचा ग्रंथपालाने ग्रंथालयात समावेश करायला हवा. तसेच वेळोवेळी वाचकांच्या वाचनाविषयी समस्या सोडविण्यास प्राधान्य देणारा ग्रंथपाल असावा. तसेच प्रचलीत जागरूक सेवा, संदर्भ ग्रंथ, तालिका यांचा परिणामकारक उपयोग कसा करावा? या विषयी माहिती ग्रंथपालाने वाचकांना पूरविली पाहिजे. याकरिता महाविद्यालयीन ग्रंथपाल हा उच्चशीक्षीत असायला पाहिजे. तसेच त्याने आपल्या व्यवसायाला न्याय देऊन वाचकांच्या समस्यांना प्राधान्य दिले पाहिजे.

**३) विद्यापिठीय ग्रंथालय**:

या प्रकारच्या ग्रंथालयात विद्यापीठीय दर्जा असलेल्या संस्था, कृषी विद्यापीठे पारंपारिक विद्यापीठे, विज्ञान तंत्र शिक्षण संस्था यांचा समावेश असतो.विद्यापीठीय ग्रंथालयात सुक्ष्म साहित्य, दृकश्राव्य साधने, संदर्भग्रंथ उदा. ब्रिटानिका एनसायक्लोपेडीया, भारतीय तसेच परदेसी नियतकालिके, प्राचीन हस्तलिखिते इत्यादींचा समावेश असायाला पाहिजे. या ग्रंथालयात विषयानुसार, लेखकानूसार किंवा वर्गीकरणानुसार तालिकांची मांडणी ग्रंथपालाने करायला हवी. विद्यापीठीय ग्रंथालय महाविद्यालयीन ग्रंथालयापेक्षा वेगळ्या स्वरूपाचे असते. विद्यापीठीय ग्रंथपाल ज्ञान संवर्धन करणारे तसेच वैचारिक स्वरूपाचे असायला हवे. विद्यापीठाच्या अभ्यासकांना व संशोधकांना ऊच्च दर्जाची माहिती सेवा ग्रंथपालाने पूरविली पाहिजे.तसेच चर्चासत्रे, विशेष प्रदर्शने, संशोधकांच्या दृष्टीने ग्रंथसूची सेवा, संशोधनाचे भाषांतर करणे, ज्ञानाचे जतन करणे इत्यादी महत्वाची कार्ये विद्यापीठीय ग्रंथालयात ग्रंथपालामार्फत केली जावीत. याकरीता विद्यापीठीय ग्रंथपाल हा उच्चशिक्षाविभूषित असायला हवा. वाचकांचे शंकांचे, गरजांचे निरसन करून तात्काळ त्यांच्या वाचनरूपी समस्या सोडविणारा ग्रंथपाल असावा.

**शैक्षणिक ग्रंथालयात ग्रंथपालाच्या भूमिकेविषयी:**

१) **ग्रंथपालाने नवीन विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय परिचय कार्यक्रम राबविणे** :

नवीन विध्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालय सुरु होण्याच्या काळात ग्रंथालयाबद्दल काहीच महिती नसते. ग्रंथालयाचे रोजचे कामकाज कसे चालते? याची माहिती वाचकांना नसते. अशा विद्यार्थ्यांना ग्रंथपालाने ग्रंथालयात आणून संक्षिप्त स्वरूपात ग्रंथालयाबद्दल माहिती देणे आवश्यक आहे. तसेच ग्रंथ कोठून घ्यावा? एका वेळेस किती ग्रंथ वाचण्यासाठी घरी घेऊन जाऊ शकतो? ग्रंथालय कोणकोणत्या सेवा देते? मुक्तद्वार म्हणजे काय? संदर्भग्रंथ म्हणजे काय? ते ग्रंथालयात कोठे ठेवलेले असतात. या सर्व प्रश्नांची उत्तरे ग्रंथालयाच्या नवीन वाचकास मिळावी म्हणून ग्रंथपालाने शाळा सुरु होण्याचा वेळेस ग्रंथालय परिचय कार्यक्रम राबवावा. त्याचप्रमाणे

ग्रंथालयाचे नियम काय आहेत. नियतकालिक विभाग याविषयीही माहिती ग्रंथपालाने विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालय सुरू होण्याच्या वेळेस सांगणे जरूरीचे आहे. जेणेकरून वाचक ग्रंथालयाकडे आकर्षित होतील आणि त्यांच्या मनात ग्रंथालयाबद्दल उत्सुकता निर्माण होईल. यासाठी दरवर्षी ग्रंथापालाने नवीन विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय परिचय कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.

२) **वर्गात शिक्षत नसतील तेव्हा पेटी ग्रंथांचे वाटप करणे:**

एखाद्या दिवशी शिक्षक गैरहजर राहिल्यास अशा तासिकेपूरते ग्रंथपालने पेटी ग्रंथालयाचे नियोजन करायला हवे. ग्रंथालयात अशा तासिकेकरता एक स्वतंत्र पेटी बनवून त्यात अंदाजे प्रत्येक तुकडीनुसार ३० ते ४० पुस्तके वाचकांसाठी ठेवली पाहिजे. ज्या दिवशी ज्या वर्गावर शिक्षक नसतील तेव्हा अशा तसिकेपूरते ग्रंथपालाने प्रत्येक वर्गासाठी ग्रंथालयातून पेटी ने- आण करण्यासाठी वर्गप्रमुखाची नियुक्ती करून द्यायला हवी. म्हणजे तोच विद्यार्थी ग्रंथालयातून ग्रंथांची पेटी वर्गावर घेऊन जाईल आणि विद्यार्थ्यांना त्या रिकाम्या तासिकेपूरते पुस्तके वाटून तासिकेचा वेळ झाल्यावर परत ते पुस्तके गोळा करून ती पेटी परत ग्रंथालयात आणून ठेवेल. जेणेकरून ती पेटी पुन्हा दुसऱ्या तुकडीसाठी वापरता येईल. अशा प्रकारे ग्रंथपालाने विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती जोपासण्यासाठी मोलाचा हातभार लावला पाहिजे. जे विद्यार्थी पेटी ग्रंथालयाचे प्रमुख असतील अशा विद्यार्थ्यांना ग्रंथपालनाचा कामाचा अनुभव मिळून त्यांच्यात नेतृत्वाचे गुण विकसीत होण्यास निश्चीत मदत होईल.

३) **डॉ. एस. आर. रंगनाथन जयंतींनिमित्त निबंध स्पर्धांचे आयोजन करणे** :

12 ऑगस्ट हा दिवस ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा जन्मदिवस दरवर्षी संपूर्ण भारतात प्रत्येक शाळा – महाविद्यालयात 'ग्रंथपाल दिवस' म्हणून साजरा केला जातो. प्रत्येक शाळा, महाविद्यालयाने दरवर्षी या दिवशी निश्चित उद्दीष्ट नजरेसमोर ठेऊन हा दिवस साजरा करायला हवा. डॉ. रंगनाथन यांच्या जयंती निमित्ताने ग्रंथपालाने अभिनव उपक्रम म्हणून जयंतीच्या दिवशी मुलांमध्ये वाचनाची सवय आणि अभिरूची निर्माण करण्यासाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करायला हवे. स्पर्धा सगळ्या विद्यार्थ्यांना अनिवार्य करून स्पर्धेसाठी 'ग्रंथ हेच गुरू','माझे आवडते पुस्तक','माझ्या शाळेचे ग्रंथालय','वाचनाचे महत्व' यांसारख्या विषयांवर निबंध लिहायला लावून प्रत्येक तुकडी मधून पहिल्या दोन किंवा तीन निबंधाना बक्षीस किंवा प्रमाणपत्र देऊन त्या विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव करायला हवा. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आणि लिखाणाची आवड निर्माण होण्यास मदत होईल. अशा प्रकारे ग्रंथपालाने यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन करून भावी सूजाणनागरिक घडविण्यासाठी नेहमी प्रयत्नशील आणि तत्पर असायला हवे.

४) **विद्यार्थ्यांना हवी असेल त्या महितीसाठी ग्रंथपालाने मदत करणे**:

शाळा, महाविद्यालयात शिकत असताना विद्यार्थ्यांना अनेक शब्दांचे अर्थ समजत नाही. अथवा अनेक शंका वाचकांना उपस्थित होतात. अशा प्रश्नांचे उत्तर जाणून घेण्यासाठी बरेच विद्यार्थी ग्रंथालयाकडे धाव घेतात. अशा वेळेस ग्रंथपालाने अशा विद्यार्थ्यांचे शंकांचे निरसन करण्यासाठी नेहमी सकारात्मक असायला हवे. विद्यार्थी

ग्रंथालयात वाचन करत असतील तेव्हा ग्रंथापालाने त्यांच्यावर लक्ष केन्द्रित करून त्यांच्या वाचनाच्या सवयी जाणून घ्यायला हव्या. तसेच त्यांना एखाद्या विषयावर हवी असणारी माहिती शोधण्यास ग्रंथपालाने नेहमी प्राधान्य दिले पाहिजे. जेणेकरून ग्रंथालयाची उद्दिष्ट्ये साध्य होण्यास मदत होईल.

५) **ग्रंथालयात येणाऱ्या प्रत्येक वाचकाकडून ग्रंथपालाने सारांश लिहून घेणे**:

ग्रंथालयात विद्यार्थी, शिक्षक, संशोधक यांसारखे वाचक येत असतात. यांपैकी काहीजण ग्रंथालयात बसून वाचतात, तर काहीजण पुस्तके घरी वाचण्यासाठी घेऊन जातात. या सर्व वाचकांकडून ग्रंथपालाने त्यांनी ग्रंथालयात अथवा घरी घेऊन गेलेल्या पुस्तकातून काय वाचले? याचा सारांश लिहून घेतला पाहिजे. यासाठी ग्रंथपालाने वाचकांसाठी स्वतंत्र सारांश रजिस्टर बनवून घ्यायला हवे. यामुळे वाचक सारांश लिहिण्याचा उद्देशाने मन लावून त्या ग्रंथांचे वाचन करतील. त्यामुळे त्यांच्यामध्ये वाचन संस्कृती दृढ होण्यास निश्चितच मदत होईल.शिवाय या सारांशच्या उपक्रमामुळे शाळा,महाविद्यालयालयातील ग्रंथपालाचे वाचकांप्रती एक वेगळे वाचन कौशल्य निर्माण करण्याचे कार्य दिसून येईल.

६) **वाचकांना नियतकालिकांची ओळख करून देणे:**

ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांना ग्रंथपालाने नियतकालिकांची ओळख करून द्यायला हवी. प्रचलीत घडामोडींच्या ज्ञानाच्या कात्रणासाठी जसे वर्तमानपत्राचा वापर होतो. तसे कात्रणासाठी दुसरे साधन म्हणून नियतकालिकांचा कसा उपयोग होतो, हे ग्रंथपालाने वाचकांना समजावून सांगितले पाहिजे. ताज्या घडामोडींवर वर्तमानपत्रात लेख प्रसिद्ध होत असतात तसेच हे लेख साप्ताहिके, पाक्षिके, मासिकांमध्येही प्रसिद्ध होत असतात. या नियतकालिकांची ग्रंथपालाने वाचकांना ओळख करून देतांना साप्ताहिकात, पाक्षिकात, महिनाभरात घडलेल्या नवीन घडामोडींच्या संदर्भात सार रूपाने सर्व वृतांत या नियतकालिकांमध्ये देण्यात येतो असे वाचकांना ग्रंथपालाने निदर्शनास आणून द्यायला हवे.

तर महिन्याभरात किंवा दोन महिन्यात प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांमध्ये एखाद्या विशिष्ट विषयावर तसेच संशोधनपर लेख प्रसिद्ध होत असतात, अशी ओळख ग्रंथपालाद्वारे वाचकांना करून दिल्यास त्यांना नियतकालिकांचे स्वरूप तसेच महत्व कळण्यास निश्चितच मदत होईल. शिवाय ग्रंथपालाने वाचकांच्या ज्ञानात भर पडण्यासाठी नियतकालिकांमधून टिपणे काढणे, नोंदी करून ठेवणे, कात्रणे काढून ठेवणे अशा गोष्टी वाचकांसाठी कायमस्वरूपी करायला हव्या.

७) **पुस्तकांचे प्रदर्शन भरविणे**:

ग्रंथालय कोणतेही असो प्रत्येक वर्षी त्यांच्यामध्ये नवीन ग्रंथांची भर पडत असते. हे नवीन ग्रंथ ग्रंथपालाने वाचकांच्या नजरेस यावी म्हणून आणि शाळा, महाविद्यालयाने वाचकांच्या सेवेसाठी कोणते ग्रंथ खरेदी केले आहेत.याची माहीती व्हावी यासाठी ग्रंथालयात नवीन पुस्तकांचे प्रदर्शन भरविले पाहिजे. तसेच दरवर्षी शैक्षणिक सत्रात अनेक दिनविशेष येत असतात. त्या दिनविशेषला त्या- त्या विषयांचे प्रदर्शन भरवायला

हवे. यामुळे ग्रंथालयात संबंधित विषयवार किती आणि कोणती पुस्तके उपलब्ध आहेत, याची माहिती होण्यास मदत होते. प्रदर्शन पाहत असताना विद्यार्थांच्या मनात वाचनाविषयी जिज्ञासा निर्माण होण्यास मदत होते.

उदा. २९ ऑगस्ट क्रीडा दिवस, १५ ऑक्टोबर वाचन प्रेरणा दिवस, १४ सप्टेंबर हिन्दी दिवस, २७ फेब्रुवारी मराठी दिवस,२८ फेब्रुवारी विज्ञान दिवस असतो. या प्रत्येक दिनविशेषला त्या दिनविशेष पुस्तकांचे प्रदर्शन ग्रंथपालाने वाचकांसाठी दरवर्षी लावायला पाहिजे. त्यामुळे वाचकांना ग्रंथालयातील सर्व पुस्तकांची माहीती तर मिळेलच. शिवाय त्यांच्यात वाचनाची गोडी निर्माण होण्यासही मदत होईल.

अशा प्रकारे ग्रंथपालाने ग्रंथालयाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी, वाचकांच्या मनात वाचनाची अभिलाषा निर्माण करण्यासाठी, प्रत्येक वाचकाला त्याचा ग्रंथ मिळण्यासाठी, प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक मिळण्यासाठी, वाचकांच्या ज्ञानात भर पडण्यासाठी, वाचनसंस्कृती टिकविण्यासाठी ग्रंथपालाने आपली भूमिका निभवायला हवी.

**सारांश:**

आज सगळ्या शाळा, महाविद्यालयांमध्ये ग्रंथालय आहे. त्यांच्यामध्ये योग्यतेनुसार ग्रंथपालांची नेमणूकही केलेली असते. पण वाचक त्या ग्रंथालयाचा पाहिजे तसा उपयोग करून घेताना दिसत नाही. म्हणून तेथील वाचकांना क्रमिक पुस्तकांवर अवलंबून न ठेवता त्यांना इतर ग्रंथांची आणि वाचन साहित्याची ओळख करून ग्रंथपालांनी शालेय जीवनातच त्यांना वाचन करायला प्रवृत्त केले पाहिजे. विद्यार्थी केवळ क्रमिक पुस्तकांवर अवलंबून राहत असल्यामुळे शालेय शिक्षणाचा दर्जा खालावत चालला आहे. तो सुधारण्यासाठी ग्रंथालयांमधून वाचकांना चांगले साहित्य उपलब्ध करून देण्यात ग्रंथपाल मोलाची भूमिका बजावू शकतात. यासाठी ग्रंथपालांनी ग्रंथालयामार्फत वाचकांसाठी नवनवीन उपक्रम राबवायला हवे.

ग्रंथपालाने विद्यार्थ्यांना ग्रंथालय साहित्याचा योग्यप्रकारे वापर करण्याचे शिक्षण दिले पाहिजे. तसेच वेगवेगळ्या वयोगटातील विद्यार्थ्यांना आवडतील अशा ग्रंथांचा परिचय ग्रंथपालाने करून द्यायला पाहिजे. ग्रंथालय साहित्याचा आणि सेवांचा विद्यार्थ्यांना अधिकाधिक लाभ करून देता यावा, म्हणून शालेय ग्रंथपालाने वाचकांच्या आवडी-निवडी जाणून त्यांना ग्रंथालयाचा वापर कसा करावा? याची माहीती द्यायला हवी. ग्रंथालयाचा वापर करण्याचे शिक्षण विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे दिल्यास विद्यार्थी ग्रंथालयाचा वापर निश्चितच मोठ्या प्रमाणावर करतील. परिणामी ग्रंथालयाचे उद्दिष्ट्य साध्य होण्यास मदत होईल.

**संदर्भसूची**:


- सावे, वसंत, (जून २०१५), शालेय ग्रंथालय, नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन, पृ. १२,१६,१७.

- कर्णिक, प्रदीप, (जून २०१५), प्रकल्पनिर्मिती : स्वरूप व लेखन,नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन, पृ. ३८.
- थोरात, लक्ष्मण, (जानेवारी २०१५), ग्रंथालय आणि महितीशास्त्र, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स, पृ.४१५,४१६.
- पवार, एस.पी.(जानेवारी २०१२), ग्रंथालय व महितीशास्त्र, कोल्हापूर : फडके प्रकाशन,पृ.४५४,४५५,४५६.